CMYK



सोलापूर तरुण भारत SOLAPUR TARUN BHARAT

# महाकुंभ

## विशेषांक








# महाकुंभ : महाव्यवस्थापनाचा मानदंड!

**त्रिवेणी संगमाच्या जसे जवळ जावे तसे तिथे तर लोकांचा महासागर उसळलेला होता. बरोबरचा माणसाचा एक सेकंद हात सुटला तरी परत सापडणं अवघड, इतकी गर्दी. मात्र प्रशासनाने अनेक ठिकाणी खोया-पाया केंद्र स्थापन केली होती व तेथून होणारी अनाउन्समेंट ही संपूर्ण कुंभ परिसरात ऐकू जाईल अशी ध्वनि यंत्रणा केलेली होती. त्यामुळे हरवलेली एखादी व्यक्ती नेमकी कुठे आहे हे अनाउन्समेंट वरून लगेच लक्षात येत होते. तसेच संगम स्थानी प्रत्येक खांबाला वेगळा नंबर दिलेला होता त्यामुळे आपले पर्जन नेमके कुठे आहेत हे एकमेकांना कळवणे सहज शक्य होत होते. संगमस्थानी खूप मोठ्या प्रमाणात महिलांच्यासाठी कपडे बदलण्याचे बंदिस्त आडोसे तयार केलेले होते. त्यामुळे महिलांची अजिबात गैरसोय होत नव्हती.**



श्रीकांत प्रभुदेसाई
इचलकरंजी

माघी पौर्णिमा, दि.१२ फेब्रुवारी या दिवशी महाकुंभमेळ्यामध्ये जाण्याचा सुयोग मला लाभला, हे माझे भाग्यच! मी श्रद्धावान असलो तरी गर्दीच्या, जत्रेच्या ठिकाणी जाण्याचे मी नेहमी टाळतोच. देवदर्शन हे शक्यतो शांतपणे, मनसोक्त व्हावे असा माझा स्वभाव. मात्र गेले चार-सहा महिने कुंभमेळ्याची तयारी, त्याच्या आयोजनातील अवाढव्यपणा आणि तितकाच नेटकेपणा, परिपूर्णता याविषयी सर्व माध्यमातून जी माहिती मिळत होती, ती पाहता हा अपूर्व योग तर आपण साधायलाच हवा अशी भावना होऊ लागली. परंतु त्याही पेक्षा व्यवस्थापन शास्त्राचा विद्यार्थी म्हणूनही आपण या कुंभमेळ्यात जायला हवे, असा मनाचा निर्धारच झाला.

कुंभमेळ्याविषयी अतिप्रचंड माहिती सर्वत्र उपलब्ध आहे. त्यामुळे त्याविषयी पुनरुक्ती करण्याचा माझा विचार नाही. मात्र व्यवस्थापन शास्त्राच्या दृष्टीकोनातून हा कुंभमेळा म्हणजे जगातील एक अद्भुत आयोजन होते, याबाबत मला कोणतीही शंका उरलेली नाही.

मुळात कुंभमेळ्याचे क्षेत्र अतिशय छोटे, म्हणजे साधारणतः १५ वर्ग किलोमीटर. म्हणजे एखाद्या छोट्या शहरापेक्षाही लहान. तरीही या जागेमध्ये कोट्यावधी लोकांची तात्पुरती व्यवस्था कशी उभारली असेल?

दुसरी गोष्ट म्हणजे कुंभमेळा गंगेच्या व यमुनेच्या संगम क्षेत्रात म्हणजेच पूरक्षेत्रातील वाळवंटामध्ये भरतो. अशा वाळवंटात भुसभुशीत जागेत इतकी प्रचंड व्यवस्था कशी उभी केली असेल? हा ही कुतुहलाचा विषय होता. कारण पावसाळ्यामध्ये या ठिकाणी दोन्ही नद्यांच्या पुराचे १५-२० फूट उंचीचे पाणी भरलेले असते. इतक्या प्रचंड प्रमाणात येणाऱ्या जनसंख्येच्या, दीड दोन महिना टिकतील अशा आवश्यक त्या सर्व व्यवस्था तात्पुरत्या स्वरूपात उभाराव्या लागणार होत्या. यामध्ये या लोकांचा निवास, आहार आणि संडास बाथरूम आदि सर्व शारीरिक गरजा आल्या. हे कसे शक्य होणार? हा देखील मूलभूत प्रश्न होता.

आपल्या महाराष्ट्रातला अनुभव असा आहे की काही लाख लोकांची आषाढी-कार्तिकी वारी ज्या भागातून जाते त्या भागातील गावातील लोक वारीनंतर महिना महिना आपले गाव सोडून दुसरीकडे राहायला जातात. इतकी बिकट अवस्था त्या गावांची होत असते. वारीमध्ये लोक एका जागी एक किंवा फार तर दोन दिवस राहतात. इथे महा कुंभात तर सतत दीड महिना वारीच्या ५० पट जास्ती लोकसंख्या विशिष्ट क्षेत्रात राहणार होती.

या सर्व प्रश्नांना कसे सोडविले याबाबत प्रत्यक्ष पाहूनच मत बनवावे, ही एक भावना महाकुंभाला जाण्यामागे होती.

मी महाकुंभात पोहोचलो तेव्हा मेळा सुरू होऊन सुमारे तीस दिवस झालेले होते. तीस दिवसांमध्ये या क्षेत्रामध्ये ४० कोटी लोक येऊन गेले अशी आकडेवारी सांगत होती. त्यामुळे त्या क्षेत्राच्या जवळ जाताच दुर्गंधीचा प्रचंड सामना करावा लागेल या मानसिक तयारीत मी होतो. त्याचप्रमाणे कचऱ्याचे, प्लास्टिकचे डोंगरच्या डोंगर पाहण्याची देखील मनाची तयारी केलेली होती. परंतु प्रामाणिकपणे सांगतो - यापैकी कोणतेही दृश्य मला कुंभामध्ये दिसले नाही. तात्पुरते उभारलेले हजारो संडास असूनही व ४० कोटी लोकांच्याकडून त्याचा वापर झालेला असूनही परिसरामध्ये नावालाही दुर्गंधी नव्हती. उलट अतिशय प्रसन्न वातावरण होते. कुंभामध्ये तीन दिवस फिरत असताना कचऱ्याचे डोंगर तर सोडाच, कचराच दिसला नाही. सफाई कर्मचारी सातत्याने सफाई करत होतेच, परंतु या करोडो लोकांमध्ये देखील अलीकडच्या काही वर्षातील सरकारच्या प्रयत्नामुळे आलेली स्वच्छतेची जागृती बऱ्याच प्रमाणात जाणवत होती. हजारो संस्था व नागरिकांनी येणाऱ्या भक्तांसाठी विनामूल्य अन्नभंडारे चालवले होते. त्यामुळे भक्तांना अन्नावरती खर्च करण्याची अजिबात गरज नव्हती. भंडाऱ्यांमध्ये बनवले जाणारे जेवण स्वच्छ व सात्विक असल्यामुळे कुणाच्या तब्येती देखील बिघडल्या नाहीत. पूर्व नियोजन केल्यामुळे सर्व भंडार्यांमध्ये स्टीलच्या ताटवाट्या वापरल्या गेल्या. त्यामुळे कागदी व प्लॅस्टिक पत्रावळ्या, पाण्याचे प्लास्टिकचे ग्लास याचेही बिलकुल दर्शन झाले नाही. पिण्याच्या पाण्यासाठी सरकारने जागोजागी विनामूल्य आर ओ वॉटर प्लांट लावलेले होते. त्यामुळे खूप चालायला लागले तरीही लोकांना पाण्यावरती खर्च करावा लागत नव्हता. या करोडो लोकांच्या साठी संडासची व्यवस्था कशी केली असेल हा एक मला मोठा प्रश्न पडलेला होता. पण या परिसरामध्ये सरकारने जी हजारो पक्की तात्पुरती टॉयलेट्स उभारली होती त्यांची सातत्याने सफाईची व्यवस्था केलेली होती. आणि शिवाय सेप्टिक टँक मधील मैला रोजच्यारोज उचलण्यासाठी टँकरची चोख व्यवस्था होती. त्यामुळे सर्व नागरिकांना स्वच्छ, आरोग्यपूर्ण, दुर्गंधीरहित व्यवस्था उपलब्ध झाली व महाकुंभमेळा परिसर निर्मळ व पवित्र राहिला.

गंगा यमुनेच्या दोन्ही तटांवर मेळा असल्याने नदीपलीकडील आखाड्यात जायचे तर मोठा वळसा मारावा लागणार व असलेले पक्के पूल वाहतूक कोंडीमुळे कुचकामी ठरणार, याबाबत सरकारने विचारपूर्वक आधीपासून तयारी केलेली होती. गंगेवर काही नव्या पक्या पुलांची निर्मिती केलेली होतीच. त्या व्यतिरिक्त केवळ या पाच-सात किलोमीटर परिसरात २५ तात्पुरते पूल उभारले होते. मात्र हे तात्पुरते पूल इतके भक्कम होते की त्याच्यावरून ट्रक देखील सुरक्षितपणे जाऊ शकतील. मोठमोठे हवाबंद टँकर नदीपात्रात अंथरून त्यावरून जाड लोखंडी प्लेट्स टाकून तात्पुरते, तरीही पक्के पूल उभारलेले होते. याला पाँटून ब्रिज किंवा स्थानिक भाषेत पीपा पूल असं म्हटलं जात होतं. असा एक पूल तयार करण्यासाठी सुमारे ११० टँकर लागत होते. व असे ३० पूल केलेले होते. यामुळेच सर्व परिसरात येणेजाणे अतिशय सुलभ झाले.

हा सर्व परिसर वालुकामय आहे आणि इतक्या लोकांना ये-जा करण्यासाठी, त्यांच्यासाठी लागणाऱ्या सर्व गरजांच्या साहित्याची वाहतूक करणे यासाठी रस्ते उभारणे हे देखील एक आव्हानच होते. यासाठी सरकारने वापरलेली पद्धत माझ्यासाठी अभिनवच होती. कदाचित अशा प्रकारचे तंत्रज्ञान सैन्यांमध्ये वापरले जात असेल. वाळूमध्ये जाड जाड अशा लोखंडी प्लेट्स अंथरून, त्या प्लेट्स एकमेकांना जोडून मोठमोठे रस्ते तयार केलेले होते. एकेका प्लेटचे वजन तीनशे किलो असेल असे सोबतच्या व्यवसायाने इंजिनीयर असलेल्या मित्राने सांगितले. रस्त्यांसाठी पाच-पंचवीस लाख प्लेट्स चा वापर नक्कीच केला गेला असेल. या प्लेट्स च्या रस्त्यांमुळे या संपूर्ण परिसरात कोठेही एकही वाहन वाळूत किंवा चिखलात रुतलेले व त्यामुळे झालेली वाहतुक अडचण दिसली नाही. प्लेट्स वर येणारी वाळू व त्यातून जाणारे करोडो लोक व जाणारी वाहने यांच्यामुळे परिसरामध्ये धुळीचे साम्राज्य निर्माण होईल हे लक्षात घेऊन दिवसातून ठराविक अंतराने रस्त्यांवर पाणी मारण्याची व्यवस्था केलेली होती. त्यामुळे ही हवाप्रदूषण पूर्णपणे टाळले होते.

महाकुंभ परिसरात एक मोठे रुग्णालय उभारलेले आहे, ज्यामध्ये अतिदक्षता विभाग देखील होता. तेथील सेवा देखील दिवसरात्र व तत्परतेने मिळत होत्या. सामान्य व तज्ञ डॉक्टर्स व आवश्यक तो पॅरामेडिकल स्टाफ, औषधे, सलाईन बॉटलस् आदि सर्वांची पर्याप्त तयारी होती. अनेक रुग्णवाहिका देखील रुग्णसेवेसाठी सज्ज होत्या. जागोजागी अग्निशामक यंत्रणा देखील तयार होती. या परिसरातील सर्व उभारणी कापडी मंडपांच्या सहाय्याने झालेली होती व कोट्यावधी लोकांसाठी दररोज दिवसरात्र अन्न शिजत होते. त्यामुळे कुठेतरी आग लागण्याचा धोका होताच. तशा १ घटना घडल्या सुद्धा. पण पूर्व तयारी मुळे फारशी हानी न होता आग विझवणे शक्य झाले. या परिसरामध्ये रात्री देखील दिवसाप्रमाणे उजेड राहील अशी विद्युत व्यवस्था केलेली होती. या हजारो खांबांची गेल्या दोन-चार महिन्यात उभारणी केली होती असे स्थानिकांकडून कळले. अचानक वीज गेल्यामुळे गोंधळ होणे व त्यामुळे नागरिकांचे अतोनात हाल होणे अशा घटना भारतामध्ये आपण अनेक वेळा बघतो. परंतु अशा प्रकारची एकही घटना कुंभ मेळ्याच्या दीड महिन्यात झाली नाही. प्रचंड गर्दीमुळे शेवटच्या ठिकाणापर्यंत मोठी वाहने सोडणे अशक्यच होते. मात्र मोठ्या प्रमाणात ई-रिक्षा उपलब्ध होत्या. त्यांच्यामुळे लोकांची मोठी सोय होत होती आणि ध्वनी व वायू प्रदूषण ही टळत होते. याहीपेक्षा एक अभिनव गोष्ट म्हणजे प्रशासनाने स्थानिक युवकांना लोकांची ने-आण करण्याची परवानगी दिली असावी (कदाचित अनधिकृतपणे). असे हजारो स्थानिक तरुण आपल्या मोटारसायकलसह दिवसरात्र राबत होते. त्यामुळे या युवकांना चांगला रोजगार मिळालाच व लोकांची ही मोठी सोय झाली. विविध प्रांतातून करोडो लोक येणार म्हणजे लाखो वाहने येणार हे तर सरळच आहे. या लाखो वाहनांना आवश्यक ते डिझेल-पेट्रोल केवळ या दीड महिन्याच्या काळात कैकपट अधीक प्रमाणात उपलब्ध करणे ही देखील फार मोठी व्यवस्था होती. याबाबत ही कोणत्याही वाहनाची गैरसोय झाली नाही. इतक्या लोकांच्यासाठी लागणारे अन्न तयार करायचे तर त्यासाठी आवश्यक ते सर्व अन्नधान्य, भाजीपाला, तेल, गॅस या सर्वांचा साठा किती आधीपासून उपलब्ध करून ठेवावा लागला असेल. कारण पूर्ण भारताच्या सुमारे ४०% लोक हे केवळ दीड महिना कालावधीमध्ये या भागात येऊन गेले. सामान्य काळापेक्षा हजारपट जास्त सर्व गोष्टी प्रयागराज-काशी-अयोध्या या परिसरात लागल्या. परंतु या कालावधीमध्ये आलेल्या प्रवाशांना कोणतीही गोष्ट मिळाली नाही असं झालं नाही. यासाठी किती आधी नियोजन करून ठेवावं लागलं असेल! साखर, चहा, दूध, बिस्किटे, पाण्याच्या बाटल्या, गॅस, सिलेंडर, अशा शेकडो गोष्टींचे विचारपूर्वक पूर्व नियोजन केले गेले होते. त्यामुळे हा दीड महिना इतक्या प्रचंड लोकसंख्येचा भार या परिसराने यशस्वीपणे पेलला. केवळ पेलला नाही, तर या संधीचे प्रत्येक व्यावसायिकाने सोने करून घेतले. कोणतीच गोष्ट अनाठाई अधिक दराने विकली गेली नाही मात्र भरपूर प्रमाणात विक्री झाल्यामुळे त्या भागातील व्यवसायिकांनी दोन-तीन वर्षाची कमाई या दीड महिन्यात नक्कीच केली. आणि ती सुद्धा येणाऱ्या भाविकांना समाधान वाटेल अशा पद्धतीने!

भक्तांच्या माथी कुमकुम टिळक लावणारे, चहा विक्री करणारे, भेळ चाट चे विक्रेते, रिक्षावाले, रस्त्यातील दुकानदार, हॉटेल्स, पेट्रोल पंप, वाहन दुरुस्ती करणारे इत्यादी सर्व व्यावसायिकांनी आपल्या क्षमतेची परीक्षा पाहणारे काम केले व भरभरून कमाई देखील केली. विश्वातल्या कल्पनेपेक्षाही प्रचंड मोठ्या अशा अभूतपूर्व मेळ्याचे आयोजन हा खरोखरच यापुढे जागतिक विद्यापीठांमध्ये अभ्यासाचा व कौतुकाचा विषय राहणार आहे, हे निश्चितच.

कुंभमेळा यशस्वी झाला हे तर सांगण्याची गरज नाहीच. परंतु या कुंभमेळ्यामुळे भारतातल्या सर्व प्रकारच्या धार्मिक आयोजनांमध्ये नक्कीच मोठ्या प्रमाणात बदल होतील. सर्व ठिकाणी या कुंभमेळ्यातल्या आदर्शाप्रमाणे व्यवस्था ठेवण्याचे प्रयत्न होतील. त्यामुळे भक्तांची देखील सोय होईल. धार्मिक श्रद्धेला मोठे पाठबळ मिळेलच, परंतु एकंदरीत भारतभर धार्मिक पर्यटनामुळे व धार्मिक मेळ्यांच्यामुळे अर्थव्यवस्थेला प्रचंड प्रमाणात चालना मिळेल असा माझा अंदाज आहे. या कुंभमेळ्यामध्ये मुळे केवळ प्रयागराज मध्ये दीड महिन्यात तीन लाख कोटी रुपयाची उलाढाल झाली. संपूर्ण भारतभरातून आलेले प्रवासी पाहता भारतभरात याच्या अनेक पट जास्त उलाढाल या कुंभमेळ्यामुळे झाली. याचा परिणाम म्हणून यावर्षीचा भारताचा विकासदर एक टक्क्यांनी वाढलेला दिसला तर अजिबात आश्चर्य वाटायला नको. तेच पोलीस, तेच सरकारी अधिकारी, तेच सरकारी कर्मचारी आणि तेच नागरिक! मात्र नेतृत्व विचारी, विश्वासार्ह व क्रियाशील असेल तर किती मोठा बदल घडू शकतो, याचे हा महाकुंभ हे मोठे उदाहरण आहे.

यामध्ये मुद्दाम उल्लेख करायला हवा अशी जाणवलेली आणखी एक गोष्ट. एकाच वेळी, एकाच ठिकाणी करोडो लोक जमले तर केवळ पोलीस व सरकारी कर्मचारी यांच्या बळावर त्यांना अनुशासित करणे केवळ अशक्य असते. यातूनच अनेक दुर्घटना घडतात. परंतु येथे आलेला सर्व जनसमुदाय हा मुळातच एका धार्मिक उद्देशाने आलेला होता व आपल्याकडून कोणतीही गैर वर्तणूक होणार नाही व आपण पापाचे धनी होणार नाही याची काळजी घेत होता. तसे त्यानां वारंवार आवाहन केले जात होते. पोलीस, सरकारी कर्मचारी हे अथकपणे, उत्तम काम करतच होते. मात्र जमलेल्या भक्तजनांपैकी गरीब-श्रीमंत, शिक्षित-अशिक्षित, सर्व जातीपंथांतील लोक हे स्वतःहून चांगले वर्तन करत हा धार्मिक सोहळ्याचा आनंद उपभोगत होते. हे देखील या महाकुंभाच्या सफलते मागील एक महत्त्वाचे कारण आहे, जे भारताच्या इतिहासातील पूर्वानुभव पाहता अनोखे आहे. फार महत्त्वाचे आहे. उद्या महाकुंभाचे पाचवे व शेवटचे स्नान संपेल तेंव्हा ६६कोटी भाविक प्रयागराज मध्ये येऊन गेलेले असतील. हे वर्षभर आणखीन कैक कोटी भाविक येत रहातील. व हिंदू धर्माकडून एक वैश्विक इतिहास रचला गेला असेल. २९ जानेवारी रोजी झालेली दुर्घटना हा या कुंभाच्या आयोजनाला लागलेला एक कलंक आहे हे नक्कीच. त्यासाठी नेमके कोण दोषी होते हे शोधून त्यांना योग्य ती शिक्षा दिली जाईलच. परंतु ही घटना वगळता कुंभमेळ्यामध्ये सर्वांचे अनुभव चांगलेच आहेत हे उल्लेखनीय!

**जय गंगे!**
**जय यमुने! जय सरस्वती!**
**जय श्रीराम! जय काशीविश्वनाथ!**




# महाकुंभ

विशेषांक



# काही कमी राहिली असेल तर माफ करा : मोदी



**महाकुंभाच्या समारोपाच्या दिवशी, पंतप्रधान मोदींनी 'एकतेचा महाकुंभ - युगातील बदलाचे चिन्ह' या शीर्षकाचा ब्लॉग लिहिला. त्यांनी लिहिले - एवढा मोठा कार्यक्रम आयोजित करणे सोपे नव्हते. मी गंगा मातेला... यमुना मातेला... सरस्वती मातेला प्रार्थना करतो... हे आई, जर आमच्या उपासनेत काही कमतरता असेल तर आम्हाला क्षमा कर. जर भाविकांच्या सेवेत काही कमतरता राहिली असेल तर मी जनतेची माफी मागतो. ४५ दिवस चाललेल्या महाकुंभाचा २६ फेब्रुवारी समारोप झाला. मात्र, आजही मेळ्यात भाविकांची गर्दी आहे. लोक स्नानासाठी संगमला पोहोचत आहेत. मेळ्यात दुकानेही लावलेली आहेत.मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, दोन्ही उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक आणि केशव प्रसाद मौर्य, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव संगमला पोहोचले. योगी आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी अरैल घाटावर स्वच्छता केली. सर्वांनी गंगेतील कचरा बाहेर काढला. गंगेची पूजा केली. योगी यांनी दुपारी गंगा पंडालमध्ये पोलिस, स्वच्छता कामगार आणि नाविकांचा सन्मान केला.**

उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांनी कचरा पिशवी धरली आणि मुख्यमंत्री योगी यांनी गंगा नदीतील कचरा बाहेर काढला आणि त्यात भरला. महाकुंभाचे शेवटचे स्नान बुधवारी महाशिवरात्रीला झाले. या काळात १.५३ कोटी लोकांनी घट केली. त्याच वेळी, संपूर्ण महाकुंभ कार्यक्रमादरम्यान, विक्रमी ६६ कोटी भाविकांनी स्नान केले. हा आकडा अमेरिकेच्या लोकसंख्येच्या (सुमारे ३४ कोटी) दुप्पट आहे. संगमात स्नान करणाऱ्यांची ही संख्या १९३ देशांच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. महाकुंभाला येणाऱ्या भाविकांच्या संख्येपेक्षा फक्त भारत आणि चीनची लोकसंख्या जास्त आहे. योगी सरकारने दावा केला की जगातील निम्म्या हिंदू लोकसंख्येइतके लोक येथे आले आहेत.

महाकुंभ हा एक जागतिक दर्जाचा कार्यक्रम बनला, ज्यामध्ये माध्यमांची भूमिका महत्त्वाची होती. थंडी असो किंवा उन, माध्यमे थांबली नाहीत आणि कार्यक्रमाचे वृत्तांकन करत राहिली. ६६ कोटी ३० लाखांहून अधिक लोकांनी डुबकी मारून विक्रम रचला. अयोध्या, चित्रकूट, गोरखपूर, प्रयागराज येथे पर्यटक आणि भाविक आले आहेत. ४५ दिवसांत १०० देशांचे प्रतिनिधी आले, राष्ट्रप्रमुख आले, केंद्र आणि राज्याने मिळून ७,५०० कोटी रुपये खर्च केले, १२ कॉरिडॉर बांधले गेले, जे भाविकांना आकर्षित करत आहेत. या काळात २०० रस्ते, १४ उड्डाणपूल, १२ कॉरिडॉर, ९ अंडरपास बांधण्यात आले. माँ सरस्वती कॉरिडॉर, बडे हनुमान जी, अशा प्रकारे येथे १२ कॉरिडॉर विकसित झाले. या काळात भाविकांच्या सोयीसाठी १ लाखाहून अधिक अधिकारी सहभागी असल्याचे सीएम योगी म्हणाले. त्यात सर्वात जास्त सुरक्षा कर्मचारी होते. जास्तीत जास्त ३००० सीसीटीव्ही बसवण्यात आले. येणाऱ्या प्रत्येक भक्ताची नोंद करण्यात आली. मी ते लखनौमध्ये बसून पाहू शकत होतो. येथे १५ हजार स्वच्छता कर्मचारी होते. शटल बसेस आणि वाहतूक बसेसची व्यवस्था करण्यात आली. सर्व विभागांनी पूर्ण सहकार्य केले.

नेत्र कुंभमेळ्याबद्दल बोलताना मुख्यमंत्री योगी म्हणाले की, येथे ६६ कोटी लोकांचे एकत्र आगमन हा जगातील सर्वात मोठा कार्यक्रम असल्याचे सिद्ध होते. महाकुंभ दरम्यान सेवेत सहभागी असलेल्या सर्व डॉक्टर्स, पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांचे मी आभार मानतो. नेत्र कुंभात अनेक लोकांवर यशस्वी उपचार करण्यात आले. महाकुंभाच्या या कार्यक्रमात, नेत्र कुंभाने नवीन नेत्रमणि जोडण्याचे काम केले आहे. मी सर्वांचे आभार मानतो. महाकुंभाच्या समाप्तीनंतर, योगींनी प्रयागराजमध्ये नाविकांशी संवाद साधला. म्हणाले- नोंदणीनंतर प्रत्येक बोट चालकाला ५ लाख रुपयांची विमा योजना दिली जाईल. गरीब खलाशांना बोटी खरेदी करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल. ज्या लोकांकडे आरोग्य विमा नाही त्यांना आयुष्मान भारत योजनेअंतर्गत कव्हर केले जाईल. मुख्यमंत्री योगी, उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक आणि केशव प्रसाद मौर्य, डीजीपी प्रशांत कुमार यांच्यासह राज्य कॅबिनेट मंत्री आणि अधिकाऱ्यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांसोबत दुपारचे जेवण घेतले. योगींच्या दोन्ही बाजूला दोन कर्मचारी बसले होते. दोन्ही उपमुख्यमंत्री त्यांच्या शेजारी बसले होते. वाराणसीमध्ये महाकुंभाच्या समाप्तीबद्दल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अजय राय म्हणाले- श्रद्धा, विश्वास आणि अभिमानाच्या इतक्या मोठ्या कार्यक्रमासाठी मी प्रयागराजच्या लोकांना आणि देशभरातील लोकांना शुभेच्छा देतो. मी विशेषतः प्रयागराजच्या लोकांचे आभार मानू इच्छितो. इतका मोठा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्यांनी व्यवस्था केली त्या आमच्या सरकारी अधिकाऱ्यांचे आणि कर्मचाऱ्यांचेही मी आभार मानू इच्छितो. सरकारी व्यवस्था पूर्णपणे कोलमडली होती. तिथे (प्रयागराज) सर्व काही भगवान रामाच्या बळावर चालले, जरी सरकारने खूप चांगले मार्केटिंग केले आहे. योगी म्हणाले- मी मेळा परिसरात २७०० कॅमेरे बसवले. लखनऊमध्ये बसूनही मी कुठे काय घडत आहे ते पाहत असे. मी प्रत्येक जागा पाहायचो. मी रात्री १२ वाजता आणि पहाटे ४ वाजता स्वच्छता कर्मचारी कसे काम करत आहेत ते पाहायचो. प्रयागराजशी संबंधित स्वच्छता कर्मचाऱ्यांना सरकारने १०,००० रुपयांचा अतिरिक्त बोनस देण्याचा निर्णय घेतला आहे. आपण नवीन व्यवस्था करणार आहोत. सफाई कामगारांना जे पूर्वी दरमहा ८ ते ११ हजार रुपये वेतन मिळत होते, ते आता एप्रिलपासून किमान १६ हजारांपर्यंत वाढवले जाईल. याशिवाय, सर्व कर्मचाऱ्यांना आयुष्मान योजनेशी जोडून सार्वजनिक आरोग्य विम्याचा लाभ दिला जाईल.

योगी म्हणाले - जगात कुठेही श्रद्धेचा इतका मोठा मेळावा कधीच झाला नव्हता. ६६ कोटी ३० लाख लोक एका कार्यक्रमाचा भाग बनले. अपहरण, दरोडा, विनयभंग किंवा बलात्काराची कोणतीही घटना घडली नाही. टेलिस्कोप आणि मायक्रोस्कोप वापरूनही ते अशा घटना उघड करू शकले नाहीत. त्यांनी प्रचार करण्याची एकही संधी सोडली नाही. मौनी अमावस्येला येथे ८ कोटी भाविक होते. एवढा मोठा मेळावा प्रयागराजला येण्याची आतुरतेने वाट पाहत होता. विरोधक आणि पक्ष सतत अपप्रचार आणि बदनामी करत होते. कोणीतरी कुठूनतरी घटनेचे दृश्य दाखवून प्रयागराजची बदनामी केली होती. प्रयागराजमध्ये मौनी अमावस्येला एक दुःखद घटना घडली, त्या सर्व कुटुंबांबद्दल आमच्या संवेदना. त्याच्या संदर्भात, दुसऱ्या कुठूनतरी घडलेल्या घटनेचा संबंध प्रयागराजशी जोडला गेला. जनतेने अशा लोकांना पूर्णपणे नाकारले आहे आणि ते तुमच्या अपप्रचाराला बळी पडणार नाहीत हे सिद्ध केले आहे. योगींनी स्वच्छता कामगार आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचा सन्मान केला. ते म्हणाले- काल महाकुंभ पूर्ण झाला. आज मी तुम्हा सर्वांना अभिवादन करण्यासाठी आलो आहे. सुरक्षा, आरोग्य आणि स्वच्छतेशी संबंधित सर्व विभागांच्या उत्तम सहकार्यामुळे महाकुंभ यशस्वी झाला. मी प्रयागराजच्या लोकांना शुभेच्छा देतो. ज्यांनी कोणताही संकोच न करता, संपूर्ण कार्यक्रमाला संपूर्ण दोन महिने त्यांचा घरगुती कार्यक्रम मानले. जर एका दिवसात २० लाख २५ लाख लोक राहत असलेल्या शहरात अचानक ५ ते ८ कोटी लोक आले तर काय होईल? जर ५ लोक राहत असलेल्या घरात अचानक १० लोक आले तर काय होईल? पण, प्रयागराजच्या लोकांनी ते आनंदाने हाताळले. प्रयागराजपासून प्रेरित होऊन, संपूर्ण राज्याने भक्त आणि संतांचे स्वागत केले. महाकुंभाच्या यशस्वी नियोजनामुळे उत्तर प्रदेश सरकारने गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड पुरस्कार जिंकला. महाकुंभादरम्यान सर्वात मोठ्या स्वच्छता मोहिमेसाठी उत्तर प्रदेश सरकारने गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड केला. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य आणि ब्रजेश पाठक यांना हा पुरस्कार स्वीकाराला. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक, केशव प्रसाद मौर्य आणि इतर कॅबिनेट मंत्र्यांनी प्रयागराजमधील अरैल घाटावर झाडलोट करून स्वच्छता केली.मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक, केशव प्रसाद मौर्य आणि इतर कॅबिनेट मंत्र्यांनी प्रयागराजमधील अरैल घाटावर गंगेची पूजा केली. महाकुंभामुळे मार्गावर परिणाम होत असल्याने, मुख्य पोस्ट ऑफिसमध्ये सहा हजारांहून अधिक पार्सलचा ढीग आहे. यामध्ये नोंदणीकृत वस्तूंचे पार्सल आणि इतर वस्तूंचा समावेश आहे. देशातील आणि परदेशातील विविध राज्यांव्यतिरिक्त, त्यात संयुक्त अरब अमिराती (एए), कुवेत, ओमानसह इतर देशांचाही समावेश आहे.

पंतप्रधान मोदींनी महाकुंभाच्या समारोपावर एक ब्लॉग लिहिला आहे. शीर्षक आहे - 'एकतेचा महाकुंभ - युग परिवर्तनाचे चिन्ह'.. त्यांनी लिहिले - एकतेचा महान यज्ञ पूर्ण झाला. जेव्हा एखाद्या राष्ट्राची जाणीव जागृत होते, जेव्हा ते शतकानुशतके गुलामगिरीच्या मानसिकतेच्या सर्व बेड्या तोडून नवीन चेतनेने हवेत श्वास घेऊ लागते, तेव्हा महाकुंभात आपण पाहिलेल्यासारखेच दृश्य दिसते. मोदींनी लिहिले आहे की, एवढा मोठा कार्यक्रम आयोजित करणे सोपे नव्हते. मी गंगा, यमुना आणि सरस्वती मातेला प्रार्थना करतो की जर आमच्या उपासनेत काही कमतरता असेल तर कृपया आम्हाला क्षमा करा. जर आपण भक्तांची सेवा करण्यात कमी पडलो असलो तर मी जनतेकडून क्षमा मागतो. पंतप्रधानांनी मुख्यमंत्री योगी यांचे कौतुक केले. ते म्हणाले- त्यांच्या नेतृत्वाखाली सरकार, प्रशासन आणि जनतेने एकत्रितपणे एकतेचा हा महान कुंभ यशस्वी केला. केंद्र असो वा राज्य, कोणीही शासक किंवा प्रशासक नव्हता, प्रत्येकजण भक्तीने भरलेला सेवक होता. जगद्गुरू शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी छत्तीसगडमधील बेमेतरा येथे सांगितले- महाकुंभ माघ पौर्णिमेच्या दिवशी संपला. सध्या सुरू असलेला महाकुंभ हा एक सरकारी महाकुंभ होता. खरा कुंभ माघ महिन्यात होतो. माघ महिन्याच्या पौर्णिमेच्या दिवशी त्याची सांगता झाली. माघ महिन्याच्या पौर्णिमेच्या दिवशी सर्व कल्पवासी तेथून निघाले होते. तेव्हाच कुंभ संपला.

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रयागराजमध्ये सांगितले - १६ हजारांहून अधिक ट्रेन चालवण्यात आल्या. महाकुंभासाठी आम्ही सुमारे ४ ते ५ कोटी भाविकांना संगमात आणू शकलो. रेल्वेच्या सर्व विभागांमधील समन्वय खूप चांगला होता. या संपूर्ण ४५ दिवसांच्या मेगा प्रकल्पादरम्यान देखभालीची कोणतीही समस्या उद्भवू दिली नाही. पंतप्रधान मोदींच्या मार्गदर्शनाखाली, सर्वत्र भक्तांना गर्दी म्हणून न पाहता त्यांची भक्ती समजून घेण्याची विशेष काळजी घेण्यात आली. विविध सरकारे आणि रेल्वे यांच्यातील परस्पर समन्वयामुळेही अनेक फायदे झाले. आम्ही सर्व प्रणालींचे विश्लेषण करू आणि रेल्वेच्या ऑपरेटिंग मॅन्युअलमध्ये कायमस्वरूपी बदल करण्यासाठी व्यवस्था देखील केली जाईल. प्रयागराजचे डीएम रवींद्र कुमार मंदार म्हणाले की, केवळ भारतातूनच नाही तर जगभरातून लोक महाकुंभात आले होते. लोकांनी सर्व व्यवस्था, प्रोटोकॉल, नियमांचे पालन केले.

मला सर्वांचे आभार मानायचे आहेत. महाकुंभमेळा संपताच, आम्ही भाविकांना त्यांच्या गंतव्यस्थानी सुरक्षितपणे परतण्याची खात्री करू. येथील तात्पुरत्या व्यवस्था योग्य आणि सुरक्षितपणे काढून टाकल्या जातील याचीही प्रशासन खात्री करेल. वर्षभर भाविक संगम घाटाला भेट देतात आणि आम्ही तिथे सुरक्षितता आणि स्वच्छता सुनिश्चित करतो. संपूर्ण महाकुंभ काळात, ६६.३० कोटी भाविकांनी पवित्र स्नान केले आहे. भारत देशाने यशस्वी नियोजन केलेल्या यंदाच्या अवाढव्य अशा महाकुंभाने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले असून जगामध्ये भारताविषयीचा आदरभाव तर वाढलाच परंतु भारत महासत्तेकडे वाटचाल करीत असल्याचा अनुभव देखील जगाने घेतला असल्याचे स्पष्ट होते आहे.



# बंधुभावाचा कुंभ

प्रयागराजमध्ये भरणारा कुंभमेळा उधळून लावण्याचे विधान खलिस्तानी दहशतवादी गुरुपतवंत पन्नू याने केले आहे. कुंभमेळा हा हिंदू धर्मातील सर्व पंथ, संप्रदाय आणि साधूंना एकत्र आणणारा जगातील सर्वांत मोठा धार्मिक उत्सव. प्रयागराजमधील कुंभमेळ्याला हजारो वर्षांची परंपरा असून, हा उत्सव केवळ धार्मिक श्रद्धेचा नव्हे, तर सांस्कृतिक आणि आध्यात्मिक एकतेचा महान प्रतीक आहे. सनातन हिंदू धर्मातील विविध परंपरांमध्ये विविधता असूनही, कुंभमेळा सर्व पंथांना एका सूत्रात बांधतो. मात्र, गुरुपतवंत पन्नूचे विधान म्हणजे त्याच्या दहशतवादी अजेंड्याचा एक भाग आहे. पन्नूला ना शीख संप्रदायाबद्दल काही ज्ञान आहे, ना या संप्रदायांच्या परंपरांचा सन्मान. त्याला फक्त हिंदू धर्मातील संप्रदायांमध्ये तेढ निर्माण करून स्वतःच्या मालकांची मर्जी राखण्यातच रस आहे. आजवर त्याने खलिस्तानची खोटी स्वप्ने दाखवून पंजाबमधील शीख बांधवांना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यात त्याला यश आले नाही. कारण, पन्नू समजतो तसा भारत देश हा काही अनेक राज्ये एकत्र येऊन निर्माण झालेला भूप्रदेश नाही. तर, भारतातील प्रत्येक भाग हा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक एकतेने एकमेकांशी जोडला गेला आहे.

शीख संप्रदायाचेही हिंदू धर्माशी असलेले नाते असेच अतूट आहे. शीख संप्रदायातील अनेक गुरूंनी कुंभस्नानाचे महत्त्व ओळखून, त्याचा लाभ घेतल्याचा इतिहास आहे. गुरू नानकदेवजी, गुरू अमरदासजी आणि गुरू हरकिशनदासजी या शीख संप्रदायातील गुरूंनी, कुंभमेळ्यात स्नान केले होते. आजही गुरू नानकदेवजी यांच्या शिकवणीचे तंतोतंत पालन करणारे उदासी पंथातील साधू, या उत्सवाचा महत्त्वाचा भाग आहेत. शीख संप्रदायाचे कुंभस्नानाशी असलेले हे सुंदर नाते, पन्नूला कसे ठाऊक असेल? त्याचे उभे जीवन वाया गेले ते निव्वळ हिंदू धर्मामध्ये फूट पाडण्याचा निष्फळ प्रयत्न करण्यात. त्यामुळे त्याने कितीही विखार ओकण्याचा प्रयत्न केला, तरी या सनातन हिंदू परंपरेतील विविध संप्रदायांमध्ये असलेला बंधुभाव, स्नेह आणि आदरभाव हाच पन्नूच्या विकृत अजेंड्यासाठी पुरेसा आहे. कुंभमेळा हा केवळ हिंदू धर्मालाच नव्हे, तर भारताच्या सांस्कृतिक वारशालाही नवीन ऊर्जा देणारा उत्सव आहे. पन्नूच्या स्वार्थी आणि कपटीबाज बुद्धीला आजवर सनातन हिंदू परंपरेतील वरवरचे सांप्रदायिक वैविध्यच दिसले. मात्र, या सर्व संप्रदायांच्या अंतरंगात असणारा बंधुभावाचा जिव्हाळा या कुंभमेळ्यातील सांप्रदायिक एकीतून दिसेल, हे नक्की.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकार कुंभमेळ्याएवढा खर्च गंगासागर यात्रेवर करत नाही, असा आरोप करत, गंगासागर यात्रेला राष्ट्रीय दर्जा देण्याची मागणी केली आहे. मागणी जरी चांगली असली, तरी पश्चिम बंगालमधील हिंदूंच्या हिताचे काय? या प्रश्नाचे उत्तर ममता बॅनर्जी कधी देणार याची वाट अखिल हिंदू बघतो आहे. मात्र, त्याची नशिबी वाट बघण्याशिवाय आजवर तरी काहीही आलेले नाही. ममता बॅनर्जी या नेहमीच मुस्लीम समाजाच्या हितासाठी कार्य करत असल्याचे दिसून आले आहे. राजकरणाच्या या तुष्टीकरणाच्या माध्यामातूनच त्यांनी, पश्चिम बंगालमध्ये मुस्लीम मतदारांची एकगठ्ठा मतपेटी तयार केली आहे. या मतदारांना खुश करण्यासाठी ममता बॅनर्जी यांचे सरकार विविध उपाययोजना करत असते. एवढी संवेदनशीलता हिंदूंसाठी त्यांनी कधीच दाखवलेली नाही. उलटपक्षी विशेषतः २०१९ सालच्या लोकसभा निवडणुकीत, फक्त जय श्रीराम अशा घोषणा दिल्यामुळे जनतेला गाडीतून उतरून झापताना देशाने पाहिले आहे. आज मात्र, अचानक ममता बॅनर्जी यांना गंगासागर यात्रेचे स्मरण होत आहे, हे विशेष म्हणावे लागेल. पण, हे विशेष घडले ते बांगलादेशातील सत्तांतरामुळे. बांगलादेशात युनूस सरकारने सत्ता हाती घेतल्यापासून तेथील हिंदूंवर अत्याचार वाढतच आहेत. यामुळे पश्चिम बंगालमधील हिंदूंच्या भावनादेखील दुखावल्या गेल्या आहेत. परिणामी, याविरोधात मोर्चे आणि निषेधाच्या माध्यमातून पश्चिम बंगालमधील हिंदू जनमत संघटित होत आहे. मुस्लीम तुष्टीकरणाच्या धोरणामुळे हा संघटित हिंदू काहीही केल्या ममता यांना मतदान करण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे आमचे सरकार हिंदू हिताचादेखील विचार करते, हे भासवण्यासाठी ममता बॅनर्जी बांगलादेशातील हिंदूंचा प्रश्न असो वा आताचा गंगासागर यात्रा असो, अशा विषयांवर बोलून हिंदू मतपेटीमध्ये विभाजन करु पाहत आहे. यासाठी, त्यांनी प्रयागराजमधील कुंभमेळा विरुद्ध पश्चिम बंगालमधील गंगासागर यात्रा असे चित्र उभे केले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा बंगाली अस्मिता चाळवण्यासाठी हा विषय मोठा करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. हे नाटक उत्तम वाटावे यासाठीच, ममता बॅनर्जी आजकाल हिंदू हिताचा कैवार आल्यासारख्या विधाने करत आहेत. मात्र, त्यांचे हे वागणे म्हणजे, 'सो चुहे खाकर बिल्ली चली हज को' या म्हणीला अनुसरूनच म्हणावे लागेल.

**- प्रतिनिधी**

# अर्थकारणाला चालना देणारा महाकुंभ

महाकुंभमेळ्यात, मकरसंक्रांतीच्या निमित्ताने प्रयागराज येथे पहिले अमृतस्नान पार पडले. आणि महाशिवरात्रीला शेवटचे स्नान झाले. तब्बल २५ हजार कोटींची उलाढाल या महाकुंभमेळ्यात झाली असेल असा अंदाज आहे. अर्थकारणाच्या सर्व घटकांना चालना देणारा हा महाकुंभ ठरला आहे. त्याचे दूरगामी सकारात्मक परिणाम येणार्या काळात दिसून येतील.

महाकुंभमेळ्यात प्रयागराज येथे पहिले अमृतस्नान झाले. महाकुंभात एकूण सहा स्नान झाले असून, त्यांपैकी तीन शाहीस्नान होते. दुसरे शाहीस्नान दि. २९ जानेवारीला मौनी अमावस्येला, तर तिसरे दि. ३ फेब्रुवारीला वसंत पंचमी रोजी पार पडले आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी यावेळी पुष्पवृष्टी केली. प्रयागराज येथे भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेत, अयोध्या तसेच काशी येथेही मोठी गर्दी होईल या शक्यतेने, तेथेही त्यांच्यासाठी सर्व सुविधा सज्ज ठेवण्यात आल्या होत्या. भाविकांना येथे पोहोचण्यास कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी रेल्वे स्थानक, विमानतळ आणि बसस्थानकावरील पर्यटक माहिती केंद्रांच्या माध्यमातून, याबाबतची माहिती दिली गेली. जगातील सर्वात मोठ्या धार्मिक मेळ्यांपैकी, एक असलेला कुंभमेळा दर १२ वर्षांनी भरतो. लाखो भाविक, पर्यटक, व्यापारी यांना एकत्र करणारा हा उत्सव. तो केवळ एक उत्सव नाही, तर अर्थकारणाला चालना देणारी ती एक मोठी घटना आहे, पर्वणी आहे. महाकुंभ मेळाव्याचे धार्मिक महत्त्व अनन्यसाधारण असेच असले तरी, आजच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेला आकार देणारी ती एक महत्त्वाची घटना आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने जे लाखो भाविक येतात, त्यामुळे मागणी वाढते. भारतासह जगभरातून भाविक यावेळी उपस्थित राहतात. त्यामुळे प्रवासाबरोबरच, स्थानिक व्यवसायांना त्याचा थेट लाभ मिळतो. स्थानिक आतिथ्य उद्योगाला यात सर्वाधिक फायदा होतो. त्याचबरोबर, मेळाव्यात हिंदू धर्मात महत्त्व असलेल्या विविध धार्मिक कलाकृतींची विक्रीही जोरात होते. दानधर्म करण्यासाठी तसेच वैयक्तिक वापरासाठी जी खरेदी केली जाते, त्यामुळे स्थानिक विक्रेत्यांना सुगीचे दिवस येतात. बाजारपेठांमध्ये विक्रमी उलाढाल होते. मोठमोठे व्यावसायिकही यात आपल्या उत्पादनांची विक्री करतात. म्हणजेच, एक आर्थिक परिसंस्था महाकुंभच्या निमित्ताने उदयास येते, असे म्हटले तर ते फारसे चुकीचे ठरणार नाही.कुंभमेळ्यामुळे तात्पुरत्या आणि दीर्घकालीन अशा अनेक रोजगाराच्या संधी निर्माण होतात. स्थानिक लोकसंख्येला, पर्यटकांच्या गर्दीमुळे निर्माण होणार्या रोजगारांचा फायदा होतो. यात आतिथ्य सेवा, वाहतूक आणि सुरक्षा यांचा उल्लेख करावा लागेल. याव्यतिरिक्त, तंबू उभारणारे कामगार, अन्नपदार्थांच्या विक्रीच्या ठेल्यावरचे कामगार आणि कार्यक्रमस्थळांवर स्वच्छता राखणारे कर्मचारी यांचा उल्लेख करता येईल. जेथे रोजगाराच्या संधी मर्यादित असतात, अशा भागात रोजगार प्रदान करतो, हे महत्त्वाचे. त्याशिवाय, कुंभमेळ्याच्या यशस्वीतेसाठी सरकार पायाभूत सुविधांसाठी मोठी तरतूद करते. भाविकांच्या सोयीसाठी या सुविधा आवश्यक अशाच असतात. यात रस्ते, सार्वजनिक स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य सेवा तसेच सुरक्षा यांचा समावेश होतो. या पायाभूत सुविधा उत्सवानंतरही स्थानिकांना कायमस्वरुपी लाभ देणार्या ठरतात. वाढलेल्या पायाभूत सुविधांमुळे, त्यानंतरच्या काळात पर्यटनाला विशेषत्वाने चालना मिळते. या उत्सवादरम्यान, अर्थव्यवस्थेत कंपन्यांची भूमिकाही कळीची असते. दिग्गज कंपन्या प्रायोजकाची भूमिका पार पाडतात. आपल्या उत्पादनांच्या प्रचारासाठी या कंपन्या कुंभमेळ्यात सक्रियपणे सहभागी होतात. आपल्या उत्पादनांना लाखो लोकांपर्यंत पोहोचवण्याची संधी हा कुंभमेळा उपलब्ध करून देतो. अनेक कंपन्या सामाजिक जबाबदारी उपक्रमांतर्गत आरोग्य उपक्रम, स्वच्छता मोहिमा यांना पाठिंबा देतात. महाकुंभासाठी केलेली तरतूद ही ५ हजार, ४३५ कोटी इतकी होती. १८८२ साली जो महाकुंभ झाला, तेव्हा देशाची लोकसंख्या २२.५ कोटी इतकी होती, तर आठ लाख भाविकांनी संगमामध्ये स्नान केले होते. २०१९ सालच्या कुंभ मेळ्यासाठी ४ हजार, २०० कोटी खर्च आला होता. यावेळच्या महाकुंभासाठी, सात हजार कोटींपेक्षा अधिक खर्चाचा अंदाज आहे. म्हणजेच, केवढे मोठे अर्थकारण महाकुंभाच्या भोवती आहे, याचा अंदाज येतो. उत्तर प्रदेश सरकारने सात हजार अतिरिक्त बसची सुविधा केलेली आहे. भाविकांना संगमावर पवित्र स्नान करता यावे, यासाठी प्रत्येक जिल्ह्यातून बसेसची सेवा सुरू करण्यात आल्या होत्या. या कुंभमेळ्यात सांस्कृतिक कार्यक्रमांचीही मोठी रेलचेल असते. त्यामुळे, सांस्कृतिक पर्यटनाला चालना मिळते. सांस्कृतिक कार्यक्रमांशी संबंधित सर्व घटकांना व्यासपीठ मिळण्याबरोबरच, चांगले उत्पन्न मिळण्याचे काम यादरम्यान होते.

२०१३ मध्ये जो महाकुंभ झाला, तेव्हा नेमके काय घडले, हे पाहाणे रंजक ठरते. दि. १४ जानेवारी ते दि. १० मार्च २०१३ पर्यंत ५५ दिवस तो चालला होता. या कुंभमेळ्याला १२ कोटींपेक्षा जास्त यात्रेकरूंनी भेट दिली होती. दि. १० फेब्रुवारी २०१३च्या शिखर स्नानाच्या दिवशी अर्थात मौनी अमावस्येला तब्बल तीन कोटी भाविकांची उपस्थिती होती. ४ हजार, ५०० तात्पुरती निवारा केंद्रे यावेळी उभारण्यात आली होती, तर मोठ्या प्रमाणावर तंबू उभारले गेले होते. ३० हजार पोलिसांनी सुरक्षेची जबाबदारी सांभाळली होती. आरोग्यसेवेसाठीच एक हजाराहून अधिक वैद्यकीय शिबिरे उभारण्यात आली होती. त्याशिवाय आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी, रुग्णवाहिका तसेच वैद्यकीय सुविधा सज्ज ठेवण्यात आल्या होत्या. त्यावेळी स्थानिक व्यवसायांना सुमारे ७५ अब्ज रुपये मिळाले, असा एक अंदाज आहे. म्हणजे उलाढाल किती झाली, याचा अंदाज बांधता येतो. योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारने महाकुंभसाठी ६ हजार, ९९० कोटी रुपयांच्या तरतुदीसह, पायाभूत सुविधांच्या विकासापासून स्वच्छतेपर्यंत ५४९ प्रकल्प राबवले आहेत. महाकुंभमुळे २५ हजार कोटी रुपयांचा महसूल मिळेल. तसेच राज्याच्या अर्थव्यवस्थेवर दोन लाख कोटी रुपयांचा आर्थिक परिणाम होईल, असा अंदाज आहे. यात पूजेच्या वस्तूंपासून पाच हजार कोटी रुपये, दुग्धजन्य पदार्थांमधून चार हजार कोटी रुपये आणि फुलांपासून ८०० कोटी रुपयांची उलाढाल होईल असे मानले जात आहे. प्रत्यक्षात हा आकडा भाविकांच्या संख्येनुसार, ठरतो. म्हणूनच, महाकुंभ हा केवळ एक आध्यात्मिक मेळा नाही, तर अर्थकारणाला गती देण्याची अद्भुत क्षमता त्यात आहे. कुंभमेळा हा म्हणूनच एक पवित्र पर्वणी तर आहेच, त्याशिवाय, ती एक महत्त्वपूर्ण अशी आर्थिक घटनाही ठरली आहे.

**- संजीव ओक**




# महाकुंभात मान्यवरांचे पवित्र स्नान




















**कुंभमेळ्याला जाणाऱ्या श्रद्धाळूंची वाहतुककोंडीबाबत काही तक्रारच नाहीच. सर्व भेदाभेद विसरून कोट्यवधी हिंदू एकत्र येऊ शकतात, ही गोष्टच विरोधकांच्या पचनी पडत नाही आहे. त्यातून एका योगी साधूने, इतक्या भव्य प्रमाणात एका हिंदू सणाचे भव्य आणि यशस्वी आयोजन केल्यानेही विरोधकांची झोप उडाली आहे. प्रयागराजमध्ये भरलेल्या पूर्णकुंभाची भव्य सांगता महाशिवरात्रीला झाली. तब्बल १४४ वर्षांनंतर भरलेल्या या महाकुंभात, ६६ कोटींपेक्षा अधिक लोकांनी श्रद्धापूर्वक स्नान केल्याचे मानले जाते. इतक्या भव्य प्रमाणावर जगात कोठेच इतकी माणसे एकत्र जमलेली दिसत नाहीत. त्यातही मानसिक आणि आध्यात्मिक समाधानाखेरीज दुसरे काहीच मिळत नसतानाही, अशा मेळाव्यात इतक्या प्रचंड प्रमाणावर सामान्य आणि गरीब-श्रीमंत लोकांनी सहभागी होणे, ही मन थक्क करून सोडणारी घटना आहे. इतक्या प्रचंड प्रमाणावर जमलेल्या गर्दीचे सुव्यवस्थित नियोजन करणे ही सुद्धा तितकीच मोठी कामगिरी असून, त्याबाबत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि त्यांच्या प्रशासनाचे, ढोल-ताशे वाजवून अभिनंदन केले पाहिजे.**

# ज्याचा त्याचा कुंभ आणि दंभ!

गी आदित्यनाथ यांनी या कुंभमेळ्यावरील टीकेला परखड आणि चपखल उत्तर देताना जे शब्द मांडले, ते लोकांच्या दीर्घकाळ स्मरणात राहतील. विधानसभेत त्यांनी या कुंभमेळ्याच्या यशावर बोलताना सांगितले, गिधाडांना मांस मिळाले, डुकरांना चिखल मिळाला, संवेदनशील लोकांना नात्यांचे सुंदर चित्र मिळाले, श्रद्धाळूंना पुण्य मिळाले, व्यापाऱ्यांना व्यवसाय मिळाला, सज्जनांना सज्जनता मिळाली, भक्तांना परमेशर प्राप्ती झाली. थोडक्यात, जी व्यक्ती ज्या भावनेने या कुंभमेळ्याकडे पाहात होती, तिला तिच्या भावनेनुसार फळ मिळाले, असा त्यांच्या बोलण्याचा उद्देश होता. सनातनींच्या प्रत्येक गोष्टीवर टीका करणे, इतकीच आयुष्याची इतिकर्तव्यता मानणार्या विरोधकांना यापेक्षा अधिक मार्मिक उत्तर दुसरे नसेल. 'ज्यां की रही भावना जैसी, प्रभू मूरत देखी तिन तैसी', असे तुलसीदासजींनीच म्हणून ठेवले आहे. तीच भावना योगीजींनी व्यक्त केली.

प्रयागराज हे प्राचीन आणि पवित्र तीर्थस्थळ असले, तरी ते एक छोटे शहर आहे. जेमतेम ४०-४५ लाख लोकवस्ती असलेल्या या शहरात भारतातूनच नव्हे, तर परदेशातूनही आलेल्या कोट्यवधी लोकांना सर्वकाळ राहणे, खाणे-पिणे आणि वीज-प्रवासाची सोय या छोट्याशा शहरात उपलब्ध होती. ६६ कोटी लोक म्हणजे निम्मा भारत, या दीड महिन्यात प्रयागराजमध्ये उपस्थित होता. त्यामुळे प्रवासाची काहीशी गैरसोय झाली, यात शंका नाही. टीका करण्यासाठी अक्कल लागत नाही. पण, इतक्या मोठ्या प्रमाणावरील गर्दीचे नियोजन करण्यासाठी, प्रशासकीय कौशल्याची

गरज असते. त्याचा थक्क करणारा अनुभव कुंभमेळ्यात सहभागी झालेल्यांना जरूर आला. या काळात येथे आलेल्या बिगर हिंदूंना, कोणीही हीन आणि भेदभावाची वागणूक दिली नाही. त्यांनाही या पवित्र जळात डुबकी मारण्याची मुभा होती. त्यांच्या खाण्यात कोणी थुंकले नाही की, आपला धर्म सोडण्याचा दबाव त्यांच्यावर टाकण्यात आला नाही. त्यांच्या धर्माचा अपमान झाला नाही की, बिगर-हिंदूंना नष्ट करण्याचे आवाहन करण्यात आले नाही. या मेळाव्यानंतर कोठेही दंगली उसळल्या नाहीत की, मशिदी आणि चर्चेसवर दगडफेक करण्यात आली नाही. तेथे ब्राह्मण, राजपूत, क्षत्रिय, वैश्य, शूद्र किंवा विविध जातींसाठी स्वतंत्र घाट नव्हते. ज्या स्थळावर जौनपूरच्या एखाद्या गरीब परिवाराने डुबकी मारली असेल, तेथेच अंबानी परिवारानेही स्नान केले. इतकेच नव्हे, तर श्रद्धाळूंच्या या अफाट जनसागराची गैरसोय होऊ नये, म्हणून साधू-महंतांनी आपल्या काही धार्मिक परंपरांनाही मुरड घातली. शिवरात्रीपूर्वी प्रयागराजमध्ये साधूंकडून नेहमी मोठी मि रवणूक काढली जाते, ती यावेळी काढण्यात आली नाही. याआधीही मौनी अमावस्येला, साधू आणि आखाड्यांच्या मिरवणुका निघाल्या नाहीत. यामुळे सनातन धर्म धोक्यात आला किंवा बुडाला, असे कोणालाही वाटले नाही. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हाच कुंभमेळ्याचा मूलमंत्र होता. सनातनींकडून सर्व धर्मांच्या लोकांचे येथे स्वागतच केले जात होते. कुंभमेळ्यावर टीका करणारे नेतेही हळूच तेथे जाऊन, संगमात डुबकी मारून आपल्या पापांचे प्रायश्चित्त करताना दिसत होते. सम ाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी कुंभमेळ्यावर आणि योगी आदित्यनाथ यांच्यावर बेछूट टीका केली आहे. तरीही तेथे संगमात जाऊन पापक्षालन करण्याची संधी त्यांनी सोडली नाही. तीच गोष्ट अनेक काँग्रेस नेत्यांची, अर्थात याला अपवाद एका परिवाराचा. निवडणुकीच्या काळात मंदिरांच्या पायऱ्या चढणारे, कपाळावर गंधाचे पट्टे ओढणारे आणि स्वत:ला जनेऊधारी हिंदू म्हणविणाऱ्या या परिवाराचा एकही सदस्य, या मेळ्याकडे फिरकला नाही. यावरून त्यांचे हिंदुत्त्व किती बेगडी आणि सोयीस्कर आहे, तेच सिद्ध झाले. भाजप विरोधकांनी कुंभम ेळ्याला न जाताच, तेथे किती गैरव्यवस्था आहे, प्रदूषण आहे, घाण आहे वगैरे बडबड केली. पण, कोट्यवधी श्रद्धाळूंनी ती ऐकूनच घेतली नाही. गंगेत स्नान केल्याने गरिबी दूर होते का? असा प्रश्न विचारणार्या मल्लिकार्जुन खर्गे यांना, त्याचे उत्तर जनतेनेच दिले आहे. या कुंभमेळ्याला आलेल्या श्रद्धाळूंनी उत्तर प्रदेशात, साडेतीन लाख कोटी रुपयांची उलाढाल केली आहे. कुंभमेळ्यामुळे हजारो गरिबांना विविध प्रकारचे रोजगार उपलब्ध झाले. गरिबच नव्हे, तर व्यावसायिक विम ान कंपन्यांनीही या कुंभकाळात नफेखोरीची डुबकी मारली. या कुंभमेळ्याची काल जरी सांगता झाली असली, तरी तेथे जाणार्यांची गर्दी इतक्यातच ओसरणारी नाही, हे स्पष्टच दिसत आहे. याशिवाय या गर्दीचा रोख प्रयागराजनंतर काशी, अयोध्येकडेही वळला आहे. त्यामुळे येते काही आठवडे, तेथील स्थानिक अर्थव्यवस्थेलाही जबरदस्त चालना मिळत राहणार आहे. कुंभमेळ्यासारखे उत्सव हा श्रद्धेचा विषय आहे. त्यासाठी कोणावरही सक्ती केली जात नाही. केवळ श्रद्धावान सनातनीच नव्हे, तर अन्य धर्मीयांनाही तेथे मुक्त प्रवेश आहे. आपल्या विशाचा आकार केवढा, या प्रश्नावर एका नामवंताने ज्याच्या त्याच्या मेंदूएवढा असे उत्तर दिले होते. तेच अशा भव्य सणांबाबत खरे आहे. ज्याची जशी श्रद्धा आहे, त्याला तसे फळ मिळाले आहे. ज्याला या कुंभमेळ्यातून जे हवे होते, तेच मिळाले आहे. त्यामुळे ज्यांना केवळ तेथील चिखलच तुडवायचा आहे, त्यांना त्याचीही मुभा आहे. हीच सनातन मानसिकता आहे.

**- राहुल बोरगांवकर**





नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

महाराष्ट्र शासन

# दावोसमध्ये घडला इतिहास प्रगतीच्या प्रवासाचा शिलान्यास...

१५,९५,९६० रोजगार
१५,७०,६०४ कोटी रुपये गुंतवणूक






७२ तास
९१+ बैठका
६१ सामंजस्य करार

स्कॅन करा आणि दावोसमधील महाराष्ट्राची यशोगाथा प्रत्यक्ष ऐका...



देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

उदय सामंत
मंत्री, उद्योग

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन